# ६
# देव मानव झाला

नव्या करारातील पहिली चार पुस्तके (मत्तय, मार्क, लुक आणि योहान) आपल्याला आजपर्यंतच्या कथातील सर्वात अदभुत कथा कथन करतात. देव मानव कसा झाला, याचे प्रकटीकरण ही पुस्तके आपल्याला करतात. ती सांगतात की, येशू ख्रिस्त जो देवाचा पुत्र या जगात मानव होऊन आला, आमच्या पापांसाठी त्याने मरण पत्करले, आणि जे त्याचा स्वीकार करतात त्यांच्यासाठी तारण म्हणजेच पापांची क्षमा आणि सार्वकालिक जीवन त्याने आणले आहे.

‘‘नवा करार’’ हे पुस्तक ऐतिहासिक कमी पण तारणाच्या योजनेविषयी अधिक बोलते, त्याचं सार हेच की देवाचा पुत्र आमच्या सुटकेसाठी आमच्यापैकीच एक झाला. म्हणून मत्तय मार्क, लुक आणि योहान ही पुस्तके केवळ प्रभूच्या जीवनाचा अभ्यास नसून ती मिशनरी संदेशाप्रमाणे आहेत. ती आपल्याला निवडक इतिहास सांगून त्या विशेष घटनांसंबंधी माहिती देतात ज्या मानवाच्या तारणाशी निगडित आहेत. म्हणूनच योहान.२१:२५ म्हणतो, ‘‘येशूने केलेली दुसरीही पुष्कळ कृत्ये आहेत, ती सर्व एकएक लिहिली तर लिहिलेली पुस्तके या जगात मावणार नाहीत, असे मला वाटते’’.

येशूने आमच्या उद्धारासाठी केलेल्या मुख्य गोष्टींपैकी कोणत्या गोष्टी नव्या करारात सांगितल्या आहेत? येशू ख्रिस्तासंबंधी सत्य काय आहे?

## येशू देव होता/आहे

येशूविषयी सर्वप्रथम सत्य आम्ही स्वीकारणे आवश्यक आहे आणि ते म्हणजे तो देव होता आणि आहे.

त्याचा जन्म म्हणजे त्याचा प्रारंभ होता का? नक्कीच नाही. बेथलहेम या ठिकाणी जन्म हा आमच्या प्रभूच्या अस्तित्वाचा प्रारंभ नाही. त्याचा जन्म म्हणजे त्याने मानव होण्यासाठी त्याने धारण केलेले शारिरिक रूप होय.

‘‘देव’’ हे जणू एक पारिवारिक नाव आहे. आपल्या प्रत्येकाला एक पारिवारिक नाव असते, ज्याद्वारा आपली आपल्या परिवारातील इतर सदस्यांसोबत ओळख असते. कुटुंबातील व्यक्तिगत व्यक्तीला पूर्ण कुटुंबात जोडणारा दुवा असतो. अशाच प्रकारे ‘‘देव’’ हे एक पारिवारिक नाव आहे. पवित्र शास्त्रात आपल्याला देव जो बाप, देव जो पुत्र आणि देव जो पवित्र आत्मा पाहायला मिळतात. या देवत्वातील दुसरा सदस्य – येशूने आम्हांसाठी मानवी रूप धारण केले.

एक परिच्छेद जो स्पष्ट घोषणा करतो की येशू देव आहे तो म्हणजे योहान.१:१–५.[१] योहान म्हणतो येशू देव आहे आणि तो अनादिकालापासून देव आहे.

> प्रारंभी शब्द होता,[२] आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभ देवासह होता. सर्वकाही त्याच्याद्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही. त्याच्या ठायी जीवन होते व ते जीवन मनुष्यमात्राचा प्रकाश होते. तो प्रकाश अंधारात प्रकाशतो, तरी अंधाराने त्याला ग्रासले नाही.

या परिच्छेदातून निघणाऱ्या चार महान सत्यांवर आपण विचार करणे आवश्यक आहे.

१) आपल्याला पाहायला मिळते की येशू हा निर्मिती नव्हता. पूर्व अस्तित्वाशिवाय येशू मानव कसा होऊ शकला असता? कोणत्याही अन्य व्यक्तीचा त्याचा जन्म आणि प्रारंभ याविषयी आपण फरक करू शकत नाही. गर्भधारणे पूर्वी त्याच्या जीवनाचा प्रारंभ झाला असे आपण त्या व्यक्तीविषयी म्हणू शकत नाही. परंतु येशूविषयी हे म्हणू शकतो. येशू केवळ जन्माच्या वेळी किंवा पुनरुत्थानानंतरच देवाचा पुत्र होता असे नाही तर तो देव आहे, सर्वोच्च आहे, त्याला कोणताही प्रारंभ नाही. तो सदैव होता आणि सदैव राहील.

---

[१]यौहान आपल्या शुभवर्तमानाला इतिहासाच्या पूर्वी पासून प्रारम्भ करतो. तो अनंतकाळामध्ये परमेश्वरापासुन आरंभ करतो. अलेक्झांड्रीया च्या फिलोला लोगोसच्यासाठी अधिक काही म्हणावयाचे आहे, जे की, त्याच्या पद्धतीमध्ये, देव आणि मणूष्यामध्ये एक मध्यस्थ होता, परंतू त्याने लोगोसच्या शरिर बनण्याच्या संभावनेला नकार दिला.

[२]जेव्हा योहान म्हणतो की, लोगोस शरिर बनले तेव्हा स्पष्टपणे तो फिलोच्या वेगळया प्रकारच्या लोगोसला प्रस्तुत करीत आहे. आपल्या (ज्ञाना) ने, फिलो लोगोस ला मानवाच्या मध्ये राहण्यायोग्य दाखवू शकला नाही. जो मानवाकडून कार्य करुन घेवू शकेल आणि त्यांना देवाचे पूत्र होण्याची शक्ती देवू शकेल. त्याकाळाच्या ग्रीक जगतामध्ये ही एक नवीन गोष्ट होती. (डोनाल्ड गुथरी, ए शॉर्टर लाईफ ऑफ ख्राईस्ट (ख्रिस्ताचे संक्षिप्त जीवन) (ग्रॅन्ड रॅपिडस्, मिश:झॉन्डरवन, १९७०), ७३).

तो त्या महिमेविषयी बोलला जी सृष्टीच्या निर्मितीपूर्वी देवपित्यासोबत होती (योहान.१७:५). तो म्हणतो, ''...मी पित्यापासून आलो आहे, मी पित्यापासून निघून जगात आलो आहे'' (योहान.१६:२७,२८). त्याने हेसुद्धा म्हटले की ''कारण जगाच्या स्थापनेपूर्वी तू माझ्यावर प्रीती केली'' (योहान.१७:२४). इतर प्रत्येक व्यक्तिने शारीरिक जन्म घेतल्याने जीवनात प्रवेश केलेला आहे. परंतु येशूच्या जन्मदिवसाचा आरंभ आहे ना आयुष्याचा शेवट (इब्री.७:३). तो संपूर्णत: सनातन आहे आणि संपूर्णत: देव आहे.

आमच्या उलट, त्याने स्वत: जन्म घेऊन जीवनविषयक अनुभव घेण्याची निवड केली. पृथ्वीवरील त्याच्या जीवनकाळात त्याने आपल्या दैवत्वाला बाजूला न सारता दैवी गुणवैशिष्टयांचा वापर करणे स्वेच्छेने टाळले. कोणत्याही क्षणी ते आपलया कोणत्याही दैवी सामर्थ्याचा अथवा दैवी इच्छेचा वापर करू शकला असता (फिलिप्पै. २:६).

२) आपण पाहतो की देवाने येशूच्याद्वारेच या जगाची निर्मिती केली. तोच खरा या विश्वाचा प्रभू आहे. १ करिंय.८:६ मध्ये म्हटले आहे की ''तरी आपला एकच देव म्हणजे पिता आहे, त्याच्यापासून अवघे झाले व आपण त्याच्यासाठी आहो, आणि आपला एकच प्रभू येशू ख्रिस्त आहे, त्याच्याद्वारा अवघे झाले व आपण त्याच्या द्वारे आहो.'' कलस्सै.१:१६ सुद्धा हेच सांगते - ''कारण आकाशांत व पृथ्वीवर असलेले, दृश्य व अदृश्य असलेले, राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले, जे काही आहे ते सर्व त्याच्यामध्ये निर्माण झाले, सर्व काही त्याच्याद्वारे व त्याच्यासाठी निर्माण झाले आहे.''

३) आपण पाहतो की येशू सजीवांना जीवन देतो आणि मृत झालेल्यांना जिवंत करतो (पाहा योहान.११:२५). तो जीवनाचा कर्ता आहे.

४) आपल्याला हा निष्कर्ष काढावा लागेल की तो जीवन आणि मृत्यू यांचा प्रभू आहे. त्यानेच सर्व काही निर्माण केले आहे, तोच सर्वांची काळजी घेतो, जीवन देतो आणि मृत्यूवर अधिकार गाजवितो.

आपल्या प्रभूच्या पृथ्वीवरील जीवनाविषयी सर्व काही आकलन आपण करू शकतो का? नि:संशय आम्ही करू शकत नाही. मानव देवाला पूर्णपणे कसा काय समजू शकतो? एखाद्या सत्यावर विश्वास करण्यासाठी त्याला समजून घेण्याची आवश्यकता नसते. मला हे समजत नाही की परमेश्वराने पृथ्वीची निर्मिती कशी केली, परंतु माझा विश्वास आहे त्याने ती केली आहे. येशू मरणातून कसा पुनरुत्थीत झाला हे अनाकलनीय आहे. परंतु तो पुनरुत्थीत झाला. अशाच प्रकारे येशू ख्रिस्त जो देव

आहे, तो मानव कसा होऊ शकला, परंतु माझा विश्वास आहे की तो मानव झाला.

## येशू, देवाचा पुत्र, मानव झाला

येशूविषयी पुढील सत्य ज्यावर आपल्याला विचार करणे आवश्यक आहे ते म्हणजे तो पूर्णंत: मानव झाला. या सत्याला आपल्या मनात प्रवेश करू द्या की देवाचा पुत्र येशूला शरीर परिधान केल्या गेले. येशू देवाचा पुत्र होता, आहे आणि सर्वदा राहीन, परंतु जन्म घेतल्याने तो मानवाचा पुत्र झाला.

पौलाने वर्णन केले आहे की येशूने पृथ्वीवर येण्यासाठी त्याने स्वर्गाचा त्याग केला. लक्षात घ्या की आपल्या पैकींच एक होण्यासाठी तो स्वर्गातून कसा खाली आला (फिलीपै २:५-८).

प्रथम त्याने स्वर्ग सोडला. आपल्या पित्याच्या अमाप प्रीतीचे सान्निध्य त्याने त्यागले.त्याने असे स्थान सोडले जेथे व्देष अस्तित्वातच नव्हता, असे स्थान जे ईर्ष्या, मत्सर आणि संदेह (संशय) यांपासून मुक्त होते. त्याने स्वर्गीय मधुर सहभागिता सोडली जेथे कलह, भांडण-तंटे अथवा वादविवाद नव्हते, असे स्थान जेथे गैरसमज अथवा गोंधळ नव्हता. त्याने स्वर्गीय विपुलतेचा त्याग केला. जेथे धनसंपत्तीची कमतरता नव्हती, दारिद्य नव्हते, आणि जेथे तहान-भूक नव्हती असे स्थान सोडणे त्याने प्रिय समजले.

दुसरे, तो मानव झाला, त्याचा जन्म म्हणजे त्याचा प्रारंभ नसून काळाच्या रंगमंचावर केवळ मानवाच्या रूपात प्रस्तुति (सादरीकरण) होती. येशू अनंतकाळ आणि समय यांचा संगम होता. दैवत्व आणि मनुष्यत्व यांचे पूर्ण मिश्रण, स्वर्ग आणि पृथ्वी एकमेकांना भेटण्याचे स्थान होते. केवळ जन्म घेण्यासाठीच नव्हे तर पूर्ण मानव होण्यासाठी त्याने सहमती दर्शविली यासाठी की त्याने मरावे. जो देव होता तो मानव झाला. परमेश्वराचा पुत्र मानवाचा पुत्र झाला.[३]

ख्रिस्तित्त्वाचे हे महान सत्य आहे. जर आपण या सत्यावर विश्वास ठेवतो तर ख्रिस्तीपणाच्या प्रत्येक सत्यावर विश्वास ठेवू शकतो. होय, ख्रिस्तीपणाचे आश्चर्यकारक

---

[३]''देवाचे मानवाच्या आत राहणे नाही, असे तर त्याला पूष्कळ अधिक असावे लागेल. मानवाचे देवता बनने सुद्धा नाही असे तर केवळ मुर्तीपूजक विचारधारेमध्येच आढळते, परंतु देव व मनूष्य, दोन स्वभावाचे एका व्यक्तीमध्ये मिळणे एक न सुटणारे कोडे आहे, जे स्पष्टीकरणाच्या संभावणेना व्यर्थ करते'' (जी. कॅम्पबेल मॉरगन, *द क्राईसेस ऑफ द ख्राईस्ट* (ओल्ड टॅपन, एन.जे.: फ्लेमिंग एच. रेवल्ल कं., १९३६), ७९).

सत्य हे आहे की नासोरी येशू जो परमेश्वर तो मानव झाला. अर्थातच त्याने त्याच्या ईश्वरत्वाला हानी न पोहोचू देता मनुष्यत्व परिधान केले. तो पूर्ण मानव होता तसा पूर्ण परमेश्वर ही होता. खिस्तीपणाच्या या भागावर जो विश्वास ठेवतो त्याला ख्रिस्तीपणाच्या इतर सत्यासंबंधी विश्वास ठेवणे अवघड जाणार नाही.

योहान लिहितो, ''शब्द देही झाला, आणि त्याने आम्हांमध्ये वस्ती केली (योहान.१:१४). दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे परमेश्वर मानव झाला, ईश्वराचा पुत्र एक यहुदी म्हणून जन्माला आला, सर्वशक्तिमान एका असहाय मानवी बालकाप्रमाणे प्रकट झाला, ज्याला अंथरुणावर पडून राहणे, एकटक बघणे, सरकणे, टाहो फोडून रडणे यापलीकडे काही एक करता येत नव्हते. इतर बालकांप्रमाणेच त्याला दूध पाजणे कपडे बदलणे आणि कसे बोलावे याचे शिक्षण घेण्याची आवश्यकता होती. या सर्व गोष्टी दृष्टीभ्रम किंवा धोका नव्हता. परमेश्वराच्या पुत्राचे बालपण एक वास्तव सत्य होतं. यावर जितका खोल विचार आपण करू तितकाच आश्चर्याने विस्मयित होत जाऊ. त्याच्या देहधारणेसंबंधी लोकांचा अविश्वास किंवा अल्पविश्वासामुळेच शुभ वर्तमानातील इतर सत्य स्विकारणे किंवा मानने जड जाते. एकदा का त्याच्या देहधारणेसंबंधी खात्री झाली की इतर संदेह निघून जातात.[४]

तिसरी, बाब म्हणजे तो मानवजातीचा दास झाला. राजा म्हणून राजवाड्यात राहण्यापेक्षा त्याने सेवक होऊन दारिद्र्यात राहणे पसंत केले. तो सेवा करवून घेण्यास नव्हे तर सेवा करण्यासाठी आला. परमेश्वर कसा आहे आणि खरी माणुसकी काय आहे हे दाखविण्यासाठी तो आला (मार्क.१०:४५).

चौथी, बाब ही की त्याने स्वत:ला मरणासाठी सादर केले. मरणासाठी स्वत:ला दिल्यावाचून तो पूर्णपणे मानव होऊ शकला नसता. तो मानवाशी समरूप झाला. त्याने सर्वात तुच्छ मरण आणि तेही वधस्तंभावरचे मरण स्वीकारले. झोपेत असतानाच मला मरण यावे असे मला वाटते. तुम्हांला कसे मरणे आवडेल? याबाबतीत आपण येशूसारखे नाहीत. सहर्ष, स्वेच्छेने व कोणतीही तक्रार न करता त्याने यातनापूर्ण, क्लेशदायक मरणासाठी स्वत:ला सादर केले.

## तो परमेश्वर मानव होऊन आम्हांमध्ये राहिला

[४]जे. आई. पॅकर, *नोईंगगॉड* (देवाला समजणे) (डाउनर्स ग्रोव्ह, खखख.: इन्टरवर्सिटी प्रेस, १९७३), ४६.

येशूविषयी आणखी एका सत्यावर आपण विचार करावा ते म्हणजे तो आम्हांमध्ये देव-मानव होऊन राहिला.

देव-मानवाचे या पृथ्वीवरील जीवनाविषयी आपण असामान्य अपेक्षा करू. तो इतर सर्वांपेक्षा भिन्न असेल यात आश्चर्य नाही की मत्तय, मार्क, लुक आणि योहान यांनी येशूचे पृथ्वीवरील जीवन पृथ्वीवर राहून गेलेल्या कोणत्याही मनुष्यापेक्षा उत्तम असे सादर केले आहे.

जर देव मानव झाला तर त्याचा जन्मही विशेषच हवा होता. त्याचा जन्म विशेषच होता. मत्तय आणि लुककृत शुभवर्तमानामध्ये त्याचा जन्म कुमारी मरियेच्या उदरी झाल्याचे सांगितले आहे. त्याला जगिक माता होती. परंतु जगिक पिता नव्हता, कारण पवित्र आत्म्याच्या द्वारे त्याची गर्भधारणा झाली (मत्तय.१:२०).

आपण अशीही आशा करू की त्याचे जीवन पूर्णत्वाने आणि दैवी शिक्षणाने भरलेले असावे जे नाशवंत मनुष्याकडून नसते. यात आश्यर्च नाही की कोणीही मनुष्य त्याच्यासारखा कधी बोलला नाही (योहान.७:४६). ज्यांनी त्याची भेट घेतली व त्याचे शिक्षण ऐकले ते सर्व त्याच्या जीवनाविषयी व त्याच्या संदेशाविषयी आश्चर्यचकित होत.

जर तो मानवी रुपात देव होता तर मानवी योग्यतेपलीकडे असलेले चमत्कार आणि अचंबित गोष्टी करून त्याने आपले दैवी सामर्थ्य प्रदर्शित केले, याचे आपल्याला आश्चर्य का वाटावे? त्याने केलेल्या चमत्कारांना त्याचे शत्रूही मान्यता देत की ते निसर्गनियमाच्या पलिकडचे आहेत. त्याने मृतांना जिवंत केले (योहान.११:४३,४४) आंधळ्यांना दृष्टी दिली (मार्क.८) आणि भोजनासाठी भाकरी व मासे बहुगुणित केले. (योहान.६) त्याच्याकडे एवढे अपार सामर्थ्य होते या तथ्याचे आपल्याला आश्चर्य वाटू नये. सरतेशेवटी त्यानेच सर्व गोष्टी निर्माण केल्या आणि तोच त्या राखतोही.

जगाच्या इतिहासात त्याचे मरण ही त्याच तोलामोलाचे असावे अशी अपेक्षा आपण करू नये काय? देवाचे वधस्तंभावर मरणे ही घटना तर सर्व युगांमध्ये सर्वात विस्मयकारी होणे आवश्यक होते. शुभवर्तमान सांगतात की तसेच झाले. येशूच्या मृत्युसमयी आकाशात अंध:कार पसरला, भूमी कांपली, पवित्रस्थानातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभंगला, थडगी उघडली, पवित्रजनांतील पुष्कळ जणांची शरीरे उठविली गेली, येशूच्या पुनरुत्थानानंतर ते यरुशलेमेत अनेकांना दिसले (मत्तय.२७:५०-५३). जेव्हा देव-मानव मरण पावला, तेव्हा एक विशिष्ट घटना घडली - याची योजना जगाचा पाया घातल्यापासूनच घडली होती.

देव-मानवाला मृत्यूवर अधिकार असावा अशी अपेक्षा आपण करणार नाही

का? खरोखर, तो मृतांमधून पुनरुत्थित झाला आहे, त्याच्याविषयी सांगितलेल्या अनेक सुस्पष्ट सत्यांपैकी हे एक सत्य आहे. चारही शुभवर्तमानकर्त्यांनी त्याच्या पुनरुत्थानाविषयी सविस्तर वर्णन केले आहे. त्याने आमच्या पातकांसाठी स्वत:ला दिले, परंतु मृतांमधून तो पुनरुत्थित झाला, यासाठी की तोच खरा ईश्वर आहे हे आम्हांला कळावे.

## सारांश

यामुळे, येशूविषयी तीन सत्ये आहेत ज्यांचा आपल्याला कधी विसर पडू नये. ते हे की : तो देव होता आणि आहे, तो मानव झाला, तो आम्हांमध्ये देव-मनुष्य होऊन राहिला.

येशूविषयीची ही तीन सत्ये आपल्याला दोन प्रकारे उत्तेजना देतात. एक म्हणजे ते आपल्याला स्मरण करवून देतात की आपला तारणारा कोणी असहाय मनुष्य नाही, परंतु तो सर्व सर्वसामर्थ्यवान, अनंत, सृष्टिकर्ता आणि राखणारा परमेश्वर आहे.

दुसरे, हे की येशूच्या पूर्वअस्तित्वामध्ये मानवजातीसाठीचे त्याचे असलेले प्रेम दिसते. त्याचे पृथ्वीवर येणे आणि आमच्या पापांसाठी मरणे यामुळेच उद्धाराची एकमेव आशा आम्हांला मिळाली. त्याने आमच्या उद्धारासाठी स्वत:ला दिले, पण पृथ्वीवरील लोक या संदेशाचा स्वीकार करून स्वत:चा उद्धार करून घेतील का? लोकांकडून एवढ्या छोट्या प्रतिसादासाठीच त्याने आपले सर्वस्व त्यागले का? येशू आम्हांसाठी जोखीम उचलण्यास इच्छुक होता. तो आमचा उद्धारकर्ता बनला. कोणीही आमचे तारण करू शकत नव्हता. जर तो आला नसता तर आम्हांला काही आशा नव्हती.

तुम्ही स्वत: मुंगी झाल्याची कल्पना करू शकता का? यासाठी तुम्हांला तुमच्या अस्तित्वाविषयीच्या अनेक संपत्तीचा त्याग करावा लागेल जसे की तुमचा मानवी देह, तुमचे सामर्थ्य, तुमची योग्यता इत्यादी. मुंगी म्हणून अनेक मर्यादेत तुम्हांला जगावं लागेल. येशू मुंगी झाला नाही, परंतु स्वर्गातील उच्च स्थान सोडून पॅलेस्ताईनमधील एक मनुष्य बनणे हे मुंगी होण्यापेक्षा किती तरी पटीने नम्रतेचे उदाहरण आहे. होय, येशू मनुष्य झाला ह्यासाठी की आपण देवाची लेकरे बनावीत.[५]

येशूने जे आमच्यासाठी केले त्यामुळे आपण आनंद करूया, त्याच्या आज्ञा

---

[५]''सनातन जो सर्व काही समजतो आणि सर्व काही निर्माण केले तो केवळ मानवच नाही परंतू (त्याच्या पहिले) एक बालक बनला आणि त्याच्या पहिले तो एका स्त्रिच्या शरिरामध्ये (भ्रुण) बनला. जर तुम्हाला त्याचे कवच पाहिजे तर विचार करा की तुम्ही एक आवरणहीन गोगलगाय की एक खेकडा बनने कसे पसंत कराल'' (सी. एस्. लैव्हीस, *मेअर ख्रिश्चियानिटी*, संशो. अंक. (न्यूयॉर्क: मॅकमिलन पब्लिशिंग कं., १९५२), १५५).

पाळूया आणि त्याला दररोज अनुसरूया.

## अभ्यासासाठी प्रश्न

*(उत्तरे पृष्ठ 232 वर आहेत)*

१. नवीन कराराची पहिली चार पुस्तके काय प्रकट करतात?
२. येशूचा जन्म म्हणजेच त्याचा प्रारंभ आहे का?
३. योहान १:१-५ मध्ये उल्लेखिलेल्या चार सत्यांची यादी करा.
४. मनुष्यजातीपैकीच एक होण्यासाठी येशूने खाली येताना कोणत्या चार गोष्टी केल्या?
५. ख्रिस्तीपणाच्या या सत्यावर विश्वास केल्यास इतर कोणत्याही सत्यावर तुम्ही विश्वास ठेवू शकता, असे केंद्रस्थानी असलेले ख्रिस्तीपणाचे सत्य कोणते?
६. येशूचा जन्म हा विशेष कसा काय होता?
७. येशूविषयी कोणती तीन सत्ये आपण विसरता कामा नये?
८. येशूचे मनुष्य होऊन पृथ्वीवर येणे हे मानवाने मुंगी होणे यापेक्षा कसे श्रेष्ठ आहे? स्पष्ट करा.

## शब्दार्थ

**देहधारणा** - देवाच्या पूत्राचे मानवी शरीरामध्ये प्रगट होणे, मणूष्याच्या स्वरुपात राहण्यासाठी येशूचे पृथ्वीवर येणे.

**मधये वस्ती करणे** - आत राहणे, जसे पवित्र आत्मा ख्रिस्ती लोकांच्या आत अर्थातच त्यांच्या जीवनात राहतो (१ करिंथ.६:१९,२०).

**अस्तित्त्वापूर्वी** - जगातील सृष्टीच्या पुर्वी अस्तित्त्वात असते. ही गोष्ट केवळ देवत्व (देवपिता, देवपूत्र आणि देव आत्मा) च्या साठीच म्हटल्या जावू शकते. मानव बनण्याच्यापूर्वी येशुचे अस्तित्त्व होते. तो अनन्त आहे, जो सर्वकाळापासून होता आणि सर्वकाळापर्यन्त राहील (पाहा योहान.१:१-११).